MHAH180003782022

नि.दि.दा. क्र. ९७/२०२२
राजेंद्र –वि.– अनिल

**निशाणी क्र. १८ वरील आदेश**

(पारीत दिनांक २७/०७/२०२६)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश VI नियम १७ अन्वये वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेस्तव सादर केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा मिळकतीच्या हद्दी खुणा निश्चीत करुन मिळणेसाठी व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केला असुन सदरील दाव्यात मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कोर्ट कमिशनर म्हणुन उप अधिक्षक भुमी अभिलेख यांची नेमणुक करण्यात आली होती. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ५ ने वादीच्या ०.०३ आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे दिसुन येते. त्याअनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

३. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्ज, म्हणणे व दाव्याचे अवलोकन केले असता दाव्याच्या प्रभावी व पूर्णतः अंतिम निर्णयाकरीता तसेच दुसऱ्या बाजूचे अपरीमीत नुकसान होत नसेल तर न्यायालयाने दाव्यात सुधारणा करण्याची विनंती मान्य करणे यथोचित ठरते. प्रस्तुत प्रकरण वादीच्या पुराव्याकरीता प्रलंबित असुन जर वादीला दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी दिली तर प्रतिवादीवर कोणताही अन्याय होणार नाही. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:-

**: आदेश :**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तावीत केल्याप्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी वादीस देण्यात येते. सदर दुरुस्ती वादीने १४ दिवसांच्या आत करावी असे निर्देशीत करण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ANUPAMA CHANDRASHEKHAR PARSHETTI
Date: 2026.07.27 17:51:56 +0530

**( श्रीमती अनुपमा चं. पारशेट्टी )**

दिनांक – २७/०७/२०२६.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर
राहुरी.